

मोरजी ग्रामसभेत रशियन फलक हटवण्याची मागणी » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आयपीएलसाठी बीसीसीआयने आखला सुपरप्लॅन » पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १२ मे २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 249 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 12 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचा भारताचा दावा !

■ नवी दिल्ली, दि. ११ :

**भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रविवारी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन 'ऑपरेशन सिंदूर'विषयी सविस्तर माहिती दिली. या महत्त्वाच्या कारवाईत ९ दहशतवादी तळांवर लक्ष्य करून १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.**



या कारवाईत आयसी-८१४ अपहरण प्रकरणात सहभागी असलेले युसुफ अझर, अब्दुल मलिक रऊफ, तसेच पुलवामा हल्ल्याशी संबंधित मुदस्सीर अहमद यांचा समावेश असल्याचेही सांगण्यात आले. ऑपरेशन सिंदूर ही लष्करी कारवाई असून ती भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचे प्रतीक आहे, असे मत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी व्यक्त केले. लखनौ येथे ब्राह्मोस इंटिग्रेशन अँड टेस्टिंग फॅसिलिटी सेंटरच्या उद्घटन प्रसंगी ते बोलत होते. या कारवाईमुळे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात आप्तेष्ट गमावलेल्या कुटुंबीयांना न्याय मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. भारत जेव्हा दहशतवादाविरोधात कारवाई करतो, तेव्हा दहशतवाद्यांना कुठलीही जागा सुरक्षित राहत नाही. 'ऑपरेशन सिंदूर' त्याचे उत्तम उदाहरण आहे असे ते म्हणाले. दहशतवादी हल्ल्यांनंतर भारत कसा प्रतिउत्तर देतो, हे जगाने पाहिले आहे.या कारवाईत पीओकेमधील दहशतवादी तळे नष्ट करण्यात आले, मात्र भारताने तेथील सामान्य नागरिकांना कोणतीही हानी पोहोचू दिली नाही. दुसरीकडे, पाकिस्तानने भारतीय धार्मिक स्थळांवर; जसे की मंदिरे, गुरुद्वारे आणि चर्चवर हल्ला करण्याचे प्रयत्न केले. त्याला भारतीय लष्कराने ठोस प्रत्युत्तर दिले.भारतीय लष्कराने सीमेलगत पाकिस्तानी लष्करी तळांवर लक्ष्य साधले असून रावळपिंडीतील मुख्यालयापर्यंत पोहोचले आहे. लखनौतील २०० एकर क्षेत्रफळाच्या ब्राह्मोस इंटिग्रेशन अँड टेस्टिंग सेंटरमुळे संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेला चालना मिळेल, तसेच अनेक थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असा विश्वास राजनाथ यांनी व्यक्त केला.

दरम्यान, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन तात्काळ बोलविण्याची मागणी केली आहे.शनिवारी संध्याकाळी भारत-पाक संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी झालेल्या करारानंतर राहुल गांधींनी हे पत्र रविवारी पाठवले. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेली युद्धबंदी यावर संसदेत चर्चा होणे आवश्यक आहे, असे राहुल गांधी यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

पान २ ►

## कळंगुट बीच शॅक हत्या प्रकरण : शॅक मालक व मुलाला जामीन

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. ११ :** तेलंगणातील एका पर्यटकाच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या कळंगुट बीचवरील मरीना बीच शॅक'चे मालक अॅग्नेलो सिल्वेरा (६४) आणि त्याचा मुलगा शुबर्ट सिल्वेरा (२३) यांना म्हापसा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांच्या (जेएमएफसी) न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

ही घटना ३० डिसेंबर २०२४ रोजी घडली होती. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी गोव्यात आलेल्या तेलंगणातील सहा पर्यटकांच्या गटातील भोला रवी तेजा (२८) याचा मारीना बीच शॅकमध्ये झालेल्या वादातून मृत्यू झाला होता. त्यानंतर शॅक मालक, त्यांचा मुलगा आणि दोन कर्मचारी अशा चार जणांना अटक करण्यात आली होती.

प्राथमिक माहितीनुसार, शॅक कर्मचाऱ्यांनी पर्यटकांना सेवा देण्यास नकार दिल्यामुळे वाद निर्माण झाला. कर्मचाऱ्यांनी आधीच बिल दिल्याचे सांगितले असतानाही पर्यटकांनी अन्न आणि पेय यांची मागणी केली. या कारणावरून वाद वाढत गेला आणि मध्यरात्रीच्या सुमारास दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाली. या झटापटीत भोला रवी तेजा याच्या डोक्यावर लाकडी काठ्यांनी वार झाल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने कांदोळी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित करण्यात आले.

याप्रकरणी अॅग्नेलो सिल्वेरा, शुबर्ट सिल्वेरा तसेच दोन नेपाळी कामगार - अनिल बिस्ता (२४) आणि कमल सुनार (२३) - यांना पोलिसांनी अटक केली होती. शॅक मालकांच्या बाजूने काम करणाऱ्या वकिलांनी सांगितले की, आरोपींनी १०० दिवसांहून अधिक काळ कोठडीत घालवला असून मार्चमध्ये आरोपपत्र दाखल झाल्यानंतर त्यांनी जामिनासाठी अर्ज केला होता. त्यांनी दावा केला की ही घटना क्षणिक वादातून घडली असून मृत्यू घडवण्याचा कोणताही पूर्वनियोजित हेतू नव्हता.दरम्यान, उर्वरित दोघे आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. केसची सुनावणी सुरू असताना, शॅक मालक व त्यांचा मुलगा यांना न्यायालयात हजेरी लावावी लागणार आहे.

## निवडक

### पंजाबमध्ये २ पाक हेरांना अटक

**मालेरकोटला, दि. ११ :** पंजाबच्या मालेरकोटला पोलिसांनी भारतीय सैन्याशी संबंधित गोपनीय माहिती पाकिस्तानला पाठवणा-या दोघांना अटक केली आहे. ही माहिती दिल्लीतील पाक उच्चायुक्तालयात (राजनयिक दूतावास) तैनात असलेल्या एका पाकिस्तानी अधिका-याला पाठवली जात होती. या आरोपींना ऑनलाइन पेमेंट मिळत होते. ते पैशाच्या बदल्यात भारतीय सैन्याच्या कारवायांची माहिती पाकिस्तानला पाठवत असे. पोलिसांना ठोस माहिती मिळाल्यावर, प्रथम एका व्यक्तीला पकडण्यात आले, ज्याने चौकशीदरम्यान दुस-या व्यक्तीचे नाव सांगितले आणि त्यालाही अटक करण्यात आली. त्यांच्याकडून दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत आणि गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आला आहे. पंजाब पोलिसांचे डीजीपी गौरव यादव यांनी या संदर्भात माहिती शेअर केली आहे. ते म्हणाले की, पंजाब पोलिस भविष्यातही देश आणि राज्याच्या सुरक्षेसाठी अशाच पद्धतीने काम करत राहतील.

---

### भारत-पाकिस्तान तणावात वर्ल्ड बँकेची एन्ट्री

**नवी दिल्ली, दि. ११ :** जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी स्पष्ट केले, की सिंधु जल करारात बँक हस्तक्षेप करणार नाही. भारत आणि पाकिस्ताननेच या करारावर तोडगा काढायचा आहे. बँकेची भूमिका केवळ सहाय्यकाची असेल. या विधानामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. आता दोन्ही देशांना एकत्र बसून पाण्याच्या वाटपाचे नियम ठरवावे लागतील. करारात बदल करण्याची मागणी भारताने यापूर्वीच केली आहे. इस्लामाबाद: जागतिक बँकेचे प्रमुख अजय बंगा यांनी पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. त्यांनी सिंधू जल करारावर महत्त्वाचे विधान केले आहे. वर्ल्ड बँक या प्रकरणात मध्यस्थी करणार नाही, असे बंगा यांनी स्पष्ट केले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील या करारात वर्ल्ड बँक कोणताही हस्तक्षेप करणार नाही.

---

### गाझामध्ये भीषण अन्नटंचाई

**जेरुसालेम, दि. ११ :** इस्त्रायलने गाझामध्ये येणारी मानवतावादी मदत गेल्या काही दिवसांपासून थांबवली आहे. त्यामुळे गाझामधील नागरिकांना भीषण अन्न टंचाईचा सामना करावा लागतोय. गाझामधील लोकांवर समुद्रातील कासवांचे मांस खाण्याची वेळ आलीये. याठिकाणी एवढी अन्नटंचाई आहे की, लोकांना कासवाचे मांस खाण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. यापूर्वी काही संस्था या लोकांना मदत करत होत्या. मात्र, त्यांच्याकडील अन्नसाठीही आता संपला आहे. गाझामधील मच्छीमारांनी सध्या समुद्रातील कासव पकडण्यास सुरुवात केली आहे. 'यापूर्वी कधीही कासवाचे मांस खाल्लेले नाही आणि आम्ही तसा विचारही केलेला नव्हता' गाझामधील मच्छमार असलेला नागरिक अब्देल कनन श्र गरूशीर शी बोलताना म्हणाला, आमच्याकडे कासवाचे मांस खाण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. आम्ही यापूर्वी कधीही कासवाचं मांस खाल्लेले नाही आणि आम्ही तसा विचारही केलेला नव्हता. आम्ही मच्छीमार आहोत, आम्ही केवळ मासेच खायचो.

---

### भारताचा रावळपिंडी एअर बेसवर हल्ला

**नवी दिल्ली, दि. ११ :**भारत पाकिस्तान यांच्यातील हवाई हल्ले आणि सैन्य दलाच्या कारवाईतून अणवस्त्र युद्धाच्या दिशेने पाऊल पडत असल्याचे दिसून आले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्यात पाकिस्तानच्या रावळपिंडी येथील नूर खान एअरबेसला लक्ष्य करण्यात आले. विशेष म्हणजे या एअरबेस पासून पाकिस्तानच्या अणवस्त्रांचा साठा अवघ्या काही किमी अंतरावर आहे. त्यामुळे, भारताच्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्तान चांगलाच बिथरला. त्यामुळे, पुढील संभाव्य धोका ओळखून पाकिस्तानने अमेरिकेकडे मध्यस्थीची मागणी करत युद्धविरामाची तयारी दर्शवली. भारत-पाकिस्तानमध्ये निर्माण झालेला तणाव हा अणवस्त्र युद्धाच्या दिशेने जाण्याची शक्यता असल्याची माहिती अमेरिकेच्या गुप्तचर खात्याकडून उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांना देण्यात आली.

## हणजूण रस्ता रुंदीकरण प्रकरण : लोबो दांपत्याला घेराव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** हणजूण येथील सेंट सेबास्टियन वॉर्डमध्ये रस्ता रुंदीकरणाच्या कामावरून रविवारी सकाळी मोठा गोंधळ निर्माण झाला. स्थानिक नागरिकांनी हे काम बेकायदेशीर असल्याचा आरोप करत कळंगुटचे आमदार मायकल लोबो आणि त्यांची पत्नी,शिवोलीच्या आमदार दिलायला लोबो यांना रोखत कठोर प्रश्न विचारले.

गेल्या काही दिवसांपासून असगाव येथून सुरू असलेल्या मातीच्या हालचाली व मोठ्या यंत्रसामग्रीच्या हालचालींमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले होते. अनेक ठिकाणी कंपाउंड तोडण्यात आल्यामुळे त्यांच्या घरांना नुकसान होणार की काय, ही चिंता नागरिकांनी व्यक्त केली.

घटनास्थळी दाखल झालेल्या आमदार मायकल लोबो आणि दिलायला लोबो यांनी नागरिकांना समजावण्याचा प्रयत्न केला की, कोणत्याही घरांना हात लावला जाणार नाही. फक्त रस्त्याच्या कडेला असलेली अनधिकृत बांधकामे हटवली जातील, असा त्यांचा दावा होता. कुंभारवाडा रस्ता अत्यंत अरुंद असून वारंवार अपघात घडतात. त्यामुळे हे काम आवश्यक आहे,असं लोबो यांनी सांगितलं.

तथापि, स्थानिक पंचायतीने ८ मे रोजी नोटीस देत १५ दिवसांची मुदत जाहीर केली असतानाही दुसऱ्याच दिवशी तोडकाम सुरू केल्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला. त्यांनी पंचायतीच्या कार्यपद्धतीवरही जोरदार टीका केली.

या मोहीमेवर स्पष्टीकरण देताना मायकल लोबो म्हणाले की, रस्ता रुंदीकरण उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या सर्व अनधिकृत अडथळ्यांना हटवण्याचे निर्देश मिळाले आहेत. मात्र, नागरिकांनी कामाचा अधिकृत आदेश मागितला व तो दाखवला नाही तर काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली.

प्रशासनाच्या विरोधात सुमारे ३०० नागरिक रस्त्यावर उतरले. त्यांनी काम थांबवण्याचा आग्रह धरला आणि रस्ता जसाचा तसा ठेवावा, अशी मागणी केली. लोबो दांपत्याने काम थांबवण्यास नकार दिला, पण सोमवारी अधिकृत आदेश दाखवण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, काही वेळासाठी जेसीबीचे काम थांबवण्यात आले होते, मात्र नंतर पुन्हा सुरू करण्यात आले. यामुळे संतप्त नागरिकांनी पुन्हा विरोध केला. लोबोंनी स्पष्ट केले की, आत्ताच्या टप्प्यात केवळ दोन्ही बाजूंनी एक मीटर रुंदीकरण करण्यात येईल, आणि संपूर्ण रस्ता ९ ते १० मीटर रुंद होईल.

विशेष म्हणजे, स्थानिकांनी चॅपेलच्या कंपाउंडवर केलेल्या तोडकामावरही आक्षेप घेतला. एकीकडे वारसास्थळे उद्ध्वस्त केली जात आहेत आणि दुसरीकडे वारसा महोत्सव साजरे केले जात आहेत, ही विरोधाभासी भूमिका कशी मान्य करता येईल? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

## आसगावमध्ये दोन महिन्यांतच हॉटमिक्स रस्ता खचला

**स्थानिकांचा संताप | पावसाळ्यापूर्वीच रस्त्याची दुरावस्था**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** स्मार्ट सिटी संकल्पनेचा अतिरेक आता गावांपर्यंत पोहोचला असून, गावे देखील स्मार्ट गाव बनवण्याच्या नावाखाली तडजोडीच्या कामांना बळी पडत आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे बार्देश तालुक्यातील आसगाव, जिथे अवघ्या दोन महिन्यांपूर्वी पूर्ण झालेला हॉटमिक्स रस्ता सध्या खचत असून, नागरिकांना धूळ, चिखल आणि असुविधांचा सामना करावा लागत आहे.

आसगावच्या मुख्य रस्त्याचे खोदकाम जलवाहिनी आणि भूमिगत ११ केव्ही व ३३ केव्ही विद्युत वाहिन्यांसाठी करण्यात आले होते. या कामांदरम्यान नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागला होता. अखेर, दोन महिन्यांपूर्वी रस्त्याचे हॉटमिक्सिंग करण्यात आले. मात्र, सध्या या रस्त्यावर खड्डे पडू लागले असून, रस्ता खचण्यास सुरुवात झाली आहे.



या प्रकरणातून सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अंतर्गत विभागांतील समन्वयाचा अभाव उघड झाला आहे. रस्ते विभागाने हॉटमिक्सिंग केले असतानाच पाणीपुरवठा विभागाने काही आठवड्यांतच रस्ता पुन्हा पुन्हा खोदला, विशेषतः जिथे जलवाहिन्यांचे वॉल्व्ह बसवण्यात आले होते. या ठिकाणी चेंबर बांधण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नव्हते आणि रस्ता नीट डांबरीकरण न झाल्याने खड्डे निर्माण झाले.

स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे की, अवघ्या दोन महिन्यांतच जर रस्त्यांची ही अवस्था असेल, तर आगामी पावसाळ्यात त्यांची काय स्थिती होईल? स्थानिक सामाजिक कार्यकर्ते ओवेन ब्रागांझा यांनी यापूर्वीच चेतावणी दिली होती की, कामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्यामुळे रस्ता पावसात धोकादायक स्थितीत जाईल.

ग्रामपंचायत सरपंच हनुमंत नाईक यांनी विभागीय समन्वयाच्या अभावावर कठोर टीका केली. हॉटमिक्सिंगसाठी कोट्यवधी रुपये खर्च होत असताना, हॉटमिक्सिंगपूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण झाली आहेत याची खात्री करणे हे रस्ते विभागाचे कर्तव्य आहे. मात्र, एकाच सार्वजनिक बांधकाम खात्याचे दोन विभाग एकमेकांशी समन्वय साधत नाहीत, हे दुर्दैवी आहे,असे ते म्हणाले. सरकारने केवळ काम पूर्ण झाल्याची घोषणा न करता, प्रत्यक्षात कामाचा दर्जा आणि विभागीय समन्वय यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

# ट्रम्प यांची काश्मीर प्रश्नावर मध्यस्थीची तयारी; भारताचे मौन

नवी दिल्ली, दि. ११ :

अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील दीर्घकालीन काश्मीर वादावर तोडगा काढण्यासाठी एकत्र काम करण्याची तयारी दर्शवली आहे. दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रांदरम्यान नुकत्याच झालेल्या युद्धबंदीच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

रविवारी आपल्या 'ट्रुथ सोशल' या माध्यमातून ट्रम्प यांनी लिहिले, हजारो वर्षांनंतर काश्मीरसाठी तोडगा निघू शकतो का, हे पाहण्यासाठी मी तुमच्या दोघांसोबत काम करायला तयार आहे. त्यांच्या या विधानामुळे भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचा मुद्दा समोर आला आहे.

काश्मीर वाद १९४७ पासून सुरू आहे, जेव्हा ब्रिटिश भारताचे फाळणीद्वारे भारत व पाकिस्तान असे दोन देश बनवण्यात आले. मुस्लिमबहुल काश्मीर प्रदेशावर दोन्ही देशांनी तीन युद्धे लढली असून, सध्या भारत आणि पाकिस्तान अनुक्रमे काही भागांवर नियंत्रण ठेवतात. भारत



प्रशासित काश्मीरमध्ये दशकांपासून स्वतंत्रतेसाठी आणि पाकिस्तानशी विलीनीकरणासाठी आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले आहे. २०१९ मध्ये भारत सरकारने जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द केले.

ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या ऑफरवर पाकिस्तानने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले की, जम्मू आणि काश्मीर प्रश्नावर तोडगा काढण्याबाबत ट्रम्प यांनी दाखवलेली इच्छा आम्ही स्वागतार्ह मानतो. या वादाचे परिणाम दक्षिण आशिया आणि त्यापलीकडेही जाणवू शकतात. पाकिस्तान पुन्हा एकदा यावर ठाम आहे की काश्मीरचा अंतिम तोडगा संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांनुसार आणि काश्मिरी जनतेच्या आत्मनिर्णयाच्या अधिकाराला मान्यता देतच निघायला हवा, असेही निवेदनात नमूद केले आहे.

दुसरीकडे, भारत सरकारकडून या विषयावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, भारतीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारकडील सूत्रांनी सांगितले की युद्धबंदीच्या पुढे कोणत्याही संवादावर चर्चा करण्याचा निर्णय झाला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, शनिवारी भारत आणि पाकिस्तान यांनी सर्व लष्करी कारवाया थांबवण्यावर सहमती दर्शवली. यासंदर्भात ट्रम्प यांनी सोशल मीडियावर युद्धबंदीचे श्रेय घेत सांगितले, अमेरिकेच्या मदतीमुळे हा ऐतिहासिक निर्णय घेता आला, याचा मला अभिमान आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथे अलीकडेच झालेल्या गोळीबारात २६ नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कारवाई सुरू केली होती. यानंतर दोन्ही देशांदरम्यान तणाव वाढला होता. भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानवर दहशतवाद्यांना पाठिंबा देण्याचा आरोप केला, तर पाकिस्तानने हे आरोप फेटाळले आहेत. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी स्पष्ट केले की युद्धबंदीनंतर दोन्ही देश अनेक मुद्द्यांवर तटस्थ स्थळी संवाद साधण्यास सहमत झाले आहेत.

दरम्यान, सिंधू जल करारावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये मतभेद कायम आहेत. भारताने करारातील सहभाग थांबवला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या राजदूत आणि लष्करी सल्लागारांना देश सोडण्यास सांगितले, सीमा ओलांडण्यावर निर्बंध घातले आणि व्यापार बंद केला. पाकिस्ताननेही प्रत्युत्तरादाखल भारतीय नागरीकांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले असून, सिमला करारातून बाहेर पडण्याची धमकी दिली आहे.